# अकोले ते श्रीरामपूर प्रवरा हरित पट्ट्यात २०० बिबटे

अकोले, ता. १६- अकोले तालुक्यातील प्रवरा पट्ट्यातील बिबट्यांची संख्या निश्चित करण्यासाठी बंगलोर येथील नॅशनल सेंटर फॉर सायन्सच्या सहकार्याने श्रीमती विद्या अत्रेय या गेल्या तीन वर्षांपासून काम करीत आहेत. 'कॅमेरा ट्रॅपिंग' व डीएनए अशा दोन तंत्राचा अवलंब करीत श्रीमती अत्रेय यांनी अकोले तालुक्यातील रूंभोडी ते श्रीरामपूर तालुका या प्रवरेच्या हरित पट्ट्यात सुमारे २०० बिबटे असल्याचा अंदाज त्यांनी अकोले पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

हालचाल नसल्याने आणि आयती शिकार मिळत असल्याने प्रवरा पट्ट्यातील बिबटे सुस्त आहेत. बिबट्याच्या खाद्यामध्ये ६० टक्के वाटा डुक्कर व कुत्र्यांचा तर ३९ टक्के हिस्सा शेळ्या-मेंढ्यांचा आहे तर मुंगुस, उदमांजर, घुस यासारखी जंगली जनावरांचे त्यांच्या आहारातील प्रभाव अवघा एक टक्का आहे ही माहिती अत्रेय यांनी बिबट्याच्या विष्ठेतून प्राप्त केली आहे. अकोले शहरात तब्बल ३ हजार डुकरे व १५० हून अधिक मोकाट कुत्री आहेत.